# महात्मा फुले कृषि विद्यापीठ,

राहुरी. जि.- अहमदनगर ४१३ ७२२

फोनः- ०२४२६-२४३२२६

ई-मेलः- comptroller.mpkv@gov.in


नियंत्रक

जा.क्र. नियंत्रक/काआ/५५६/२०१९
दि.२२/०३/२०१९

## परिपत्रक

**विषय :- माहे मार्च २०१९ अखेरच्या वित्तीय कामकाजाबाबत...**

आर्थिक वर्ष २०१८-१९ अखेरीस असणाऱ्या महत्वाच्या व तातडीच्या कामांसाठी, नियंत्रक कार्यालयाच्या अधिनस्त सहाय्यक नियंत्रक १, सहाय्यक नियंत्रक २ व अधिदान व लेखा अधिकारी, राहुरी/पुणे/धुळे/कोल्हापूर ही कार्यालये दि.२३.०३.२०१९ व २४.०३.२०१९ रोजी सुट्टीच्या दिवशी नियमीतपणे सुरु ठेवावीत आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी आवश्यकता असल्यास या दिवशी अधिदान व लेखा अधिकारी कार्यलयात देयके सादर करावीत.

देयके सादर करण्याचा व प्राप्त देयकांवर कार्यवाही करण्याचा प्राधान्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

१. PFMS प्रणालीवर नोंदवली जाणारी देयके आहरण व संवितरण अधिकारी यांनी प्रथम प्राधान्याने (First Priority) तयार करुन अधिदान व लेखा अधिकारी कार्यालयात सादर करावीत. अधिदान व लेखा अधिकारी कार्यालयाने अशी देयके प्रथम प्राधान्याने पारीत करुन दि.३०.०३.२०१९ पूर्वी बँकेमध्ये खर्च होतील याची दक्षता घ्यावी.

२. भा.कृ.अ.प व इतर निधी, ज्या निधींचे दि.३१.०३.२०१९ अखेरचे उपयोगीता प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे, अशी देयके आहरण व संवितरण अधिकारी यांनी दुसऱ्या प्राधान्याने (Second Priority) तयार करुन आधिदान व लेखा अधिकारी कार्यालयात सादर करावीत आणि अधिदान व लेखा अधिकारी यांनी अशी देयके तातडीने पारित करण्याची कार्यवाही करावी.

३. उपरोक्त अ.क्र. १ व २ चे प्राधान्यक्रम पाळल्यानंतर इतर निधींची, जसे विद्यापीठ महसूली उत्पन्न निधी / उत्पादन चाचणी निधी / फिरता निधी व इतर देयके उर्वरित कालावधीत सादर करावीत व पारीत करावीत.

विद्यापीठ महसूली उत्पन्न निधी / उत्पादन चाचणी निधी / फिरता निधी हे विद्यापीठ निधीचा भाग असल्याने अशा निधीला वर्षाअखेर खर्चाचे बंधन नाही. अशा निधींतील खर्चाची देयके वरील १ व २ प्रमाणे कार्यवाहीनंतर शक्यतो याच आर्थिक वर्षात सादर करावीत.

४. वित्त विभाग परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २०१९/प्र.क्र.३३/२०१९/कोषा प्रशा-५, दि ०७ मार्च २०१९ या शासन परिपत्रकान्वये सुचित करण्यात येते की, सर्व अधिदान व लेखा अधिकारी तसेच सहाय्यक नियंत्रक १/२/३/४, यांनी दिनांक ३० मार्च २०१८ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत प्रदाने नेहमीप्रमाणे ECS/NEFT/RTGS द्वारे करावीत. उर्वरीत कमीत कमी प्रदाने ECS/NEFT/RTGS ऐवजी रेखांकीत धनादेशाद्वारे करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

ही सुविधा PFMS प्रणालीद्वारे होणारे खर्चाबाबत लागू नाही.

५. GeM Portal वर करण्यात आलेल्या खरेदीची देयके कमाल दहा दिवसांत प्रदान होतील याची सर्व याची सर्व आहरण व संवितरण अधिकारी आणि अधिदान व लेखा अधिकारी यांनी संयुक्तपणे दक्षता घ्यावी.

(विजय कोते)
नियंत्रक
महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. सहाय्यक नियंत्रक १/२ मफुकृवि, राहुरी
२. अधिदान व लेखा अधिकारी, राहुरी /पुणे/धुळे/ कोल्हापूर
३. सर्व आहरण व संवितरण आधिकारी